
# देवाने मोशे व यहोशवाला आनंददायी सत्ये प्रकट केली


**प्रार्थना :** ''सर्वशक्तीमान, सार्वकालिक देवा मुलांनी तुझी ओळख करुन घ्यावी आणि तुझे पावित्र्य व भव्यपणाची प्रशंसा करावी यासाठी त्यांचे साहाय्य कर.''

मुलांच्या गरजा, त्यांची तयारी करुन घेण्यासाठी तुमच्याकडे असणारा वेळ आणि त्यांची समजबुद्धी या गोष्टी घेऊन कार्यक्रम निवडा.



मोठया मुलाने किंवा शिक्षकाने **निर्गम 3:1-15** मधून देव जळत्या झुडुपातून मोशेशी कसा बोलला ते वाचून दाखवावे. मग पुढे दिलेले प्रश्न, प्रत्येक मुलाने एकेक करुन उपासनेमध्ये मोठया माणसांना विचारण्याकरीना ठखून द्या. प्रत्येक मुलाना तो विचारणार असलेल्या प्रश्नाचे उत्तर येत असले पाहिजे. *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले/आहे)*

- झुडुपाबाबत काय विशेष होते? *(ते पेटले होते तरी जळत नव्हते)*
- झुडुपातून मोशेला काय ऐकू आले? *(त्याला नावाने हाक मारली)*
- मोशेला त्याचे नाव घेऊन कोणी हाक मारली? [**देवाने** *(अब्राहाम, इसहाक व याकोबाच्या देवाने)*]
- मोशेने आपल्या पायातील जोडे का काढले? *[तो पवित्र भूमीवर उभा होता.]*
- देवाने मोशेला काय करण्यास सांगितले? *[फारो राजाकडे जाऊन देवाच्या लोकांना इजिप्त मधून बाहेर काढण्यास सांगितले.]*
- देवाने आपले नाव काय आहे असे सांगितले? *[मी आहे.]*



मोठया मुलाने किंवा शिक्षकाने यार्देन नदी आलांडणे याविषयी यहोशवा 3:14-4:7 मधून वाचून दाखवावे अथवा सांगावे. या शास्त्रभागावरुन देवाने लोकांसाठी केलेल्या महान गोष्टी त्यांच्या लक्षात असतात हे समजते.

कथा-वृत्तांत सांगून/झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. *[प्रश्नाच्या पुढे उत्तर दिले आहे.]*

- कोणते इस्राएल लोक यार्देन नदीतून प्रथम पलिकडे गेले? *[वाचा यहोशवा 3:14]*
- कोश राहणाया याजकांचे पाय नदीला लागताच काय घडले? *[3:15]*
- बारा पुढायांनी नदीच्या मध्यभागतून काय उचलून घेतले? *[4:3]*
- हे धोंडे उचलून घेण्यामागे काय हेतू होता? *[4:6]*
- पुढायांनी नदीतून उचलून घेतलेले धोंडे कोठे ठेवले? *[4:8]*

यार्देन नदी ओलांडण्याच्या कथा वृत्तांताचे नाट्यीकरण करा. उपासनेच्या पुढायांशी चर्चा करुन मुलांना नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा. मोठया मुलांनी लहान मुलांकडून तयारी करुन घेण्यासाठी मदत करावी.

- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **यहोशवा** व **निवेदक** ह्या भूमिका कराव्यात.
- **लहान मुलांनी इस्राएल लोक, पुढारी** आणि कराराचा कोश वाहणारे **याजक** ह्या भूमिका कराव्यात. याजकांकडे वाहून नेता येईल असे काही द्या.

**निवेदक :** यहोशवा 3:14-17 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून मग म्हणा, ''यहोशवा काय म्हणतो ते ऐका''

**यहोशवा :** ''आपण यार्देन नदी ओलांडून पलिकडे जाणार आहोत. नदी दुथडी भरुन वाहत असली तरी देव आम्हांला कोरडया भूमीवरुन पलिकडे नेणार आहे. तो आपल्यासाठी काय करतो ते पाहा. याजकांनो, कराराचा कोश घेऊन पाण्यात उतरा.

**याजक :** कराराचा कोश घेऊन 'नदीत' अर्ध्यावर जाऊन थांबा. एकाने म्हणा, ''ते पाहा! नदीच्या पाण्याची रास होऊन ते वरच्या बाजूला जमा होत आहे.''

**इस्राएल लोक :** संपूर्ण 'नदी' ओलांडून याजकांनाही मागे टाकून/पुढे जा. एकाने म्हणावे, ''हे बघितले का! आपले पाय अगदी कोरडे आहेत. आपण जमिनीवरुन चालत आलो!''

**निवेदक : यहोशवा 4:1-7** मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून मग म्हणा, ''यहोशवा काय सांगतो ते ऐका''


**यहोशवा :** इस्राएल लोक उभे आहेत तिथे जाऊन म्हणा, ''आपण नदी ओलांडून आलो! प्रत्येक वंशाच्या पुढ़ायाने नदीच्या मध्यभागातून एकेक धोंडा उचलून आणावा, आजच्या दिवशी देवाने आमच्याकरीता काय केले त्याची आठवण आपल्या मुलांना असावी यासाठी ह्या धोंडयांचे स्मारक करु.''

**पुढारी :** याजक उभे असतील तिथे जा. एक अत्यंत जड धोंडा उचलून चालत असल्याचा अभिनय करा आणि यहोशवाकडे जा. एकाने म्हणावे, ''हे धोंडे चांगले भरभक्कम आहेत. याचे स्मारक चांगले बांधता येईल''

**यहोशवा :** ''आपली मुले विचारतील 'ह्या धोंड्यांचे तुमच्या दृष्टीने काय महत्त्व आहे?' मग आपण त्यांना आजच्या दिवसाविषयी सांगू. देवाचे अद्‌भुत कार्य आपल्या लक्षात राहिल''.

**निवेदक :** मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांना प्रौढांना प्रश्न विचारण्यास सांगा.



लहान मुलांना दगडांच रास करुन ठेवल्याचे चित्र काढायला सांगा. पुढच्या उपासनेच्या वेळी मुलांनी हे चित्र मोठया माणसांना दाखवावे आणि देवाने आमच्यासाठी काय केले ते लक्षात ठेवण्यासाठी आपण गीते, कथा व इतर गोष्टींचा कसा उपयोग करतो ते यावरून स्पष्ट होते हे सांगा.

धोंड्यांच्या राशीचे स्मारक करणे या शिवाय इतर कोणत्या मार्गांनी आपण ख्रिस्ती लोक देवाची कृत्ये लक्षात ठेवतो. लोकांनी उदाहरणे सांगून चर्चा करावी.

**कविता** स्तोत्र. 145:4-7 ही चार वचने चार मुलांनी प्रत्येकी एक याप्रमाणे उपासनेमध्ये इतर मुले आणि प्रौढांसाठी म्हणावीत.

**लहान मुलांनी** फिलिप्पै. 4:4 हे वचन पाठ करावे.

**मोठया मुलांनी** अनुवाद 8:3 हे वचन पाठ करावे.

**मोठया मुलांनी,** आम्ही लक्षात ठेवावे अशा देवाने केलेल्या महान गोष्टींविषयी कविता किंवा गीत लिहावे.

**प्रार्थना :** ''प्रिय पित्या, तू आमच्यासाठी अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या आहेस. त्या आम्ही लक्षात ठेवून तुझी त्यासाठी सतत स्तुती करावी यासाठी आमचे साहाय्य कर. इतर मुलांनाही आम्ही त्या विषयी सांगावे याकरीता/आमची मदत कर. तुझे चांगुलपण त्यांच्या पक्के लक्षात राहावे यासाठी आम्हांला प्रत्यक्ष कृती करण्यास मदत कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net